महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक,अमरावती विभाग,अमरावती
पत्ता - कृषि भवन, कृषि संकूल, तपोवन रोड, कॅम्प,अमरावती-४४४ ६०२
फोन नं. ०७२१-२५५२४२२ ई-मेल - jdaamravati11@gmail.com

**विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालयांतर्गत गट - क संवर्गातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे "कृषि सेवक" म्हणून निश्चित वेतनावर सरळसेवेने भरावयाच्या पदाकरीता संगणक आधारीत परिक्षा (Computer Based Online examination) आयोजित करणेबाबत जाहिरात सन २०१९.**

जाहिरात क्रमांक : विकृससंअम/अ-३/सन-२०१९/गट-क/कृसे/भरती/५९/१९, दि.०३/०१/२०१९

**कृषि सहाय्यकांची रिक्त पदे "कृषि सेवक" म्हणून निश्चित वेतनावर सरळ सेवेने भरण्याकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. या पदासाठी अर्हताप्राप्त पात्र उमेदवार अर्ज करु शकतील.**

**वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दि. ०५/०१/२०१९ ते २५/०१/२०१९ |
| २. | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | परिक्षेच्या दिनांकापर्यंत |
| ३. | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महापरिक्षा पोर्टलवर जाहीर करण्यात येईल |

**टिप :**

१) विभागीय कृषि सहसंचालक,अमरावती विभाग अमरावती कार्यालयांतर्गत **गट-क** संवर्गातील कृषि सहाय्यकांची **अनुसूचित क्षेत्राबाहेरील- एकुण १९७ व अनुसूचित क्षेत्रातील(पेसा) स्थानिक अनुसूचित जमाती या प्रवर्गातील- एकूण ८२** रिक्त पदे कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळ सेवेने भरण्यासाठी www.mahapariksha.gov.in व कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

२) सविस्तर जाहिरातीमध्ये देण्यात आलेली परीक्षा विषयक सर्व माहिती जसे समांतर आरक्षणासह रिक्त पदांचा तपशिल, आवेदन पत्र भरणे, परीक्षा शुल्क, शैक्षणीक अर्हता, अभ्यासक्रम, परिक्षेचे स्वरुप, निकाल विषयक सविस्तर माहिती, शासन निर्णयातील प्रत्येक सुचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज भरावा.

३) अर्ज भरतांना उमेदवारांनी शैक्षणीक अर्हता विषयक माहिती तसेच दिव्यांगत्व व जात इत्यादी बाबतची माहिती मुळ प्रमाणपत्रावरुन भरावी. स्कॅन केलेला नवीनतम रंगीत फोटो व स्कॅन केलेली स्वाक्षरी ऑनलाईन आवेदनपत्रात अपलोड करावयाची असल्याने सोबत ठेवावी.

४) सदर परिक्षेस प्रविष्ट होऊ ईच्छिणाऱ्या उमेदवारांशी सर्व संपर्क Online, SMS सुविधा याव्दारे होऊ शकतो त्यामुळे उमेदवारांनी स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल (Email ID) अचूक द्यावा.

५) सदर जाहिरातीनुसार उमेदवारांना केवळ ऑनलाईन अर्ज करता येईल. परीक्षेचे शुल्क क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / एटीएम / इंटरनेट बँकिंग / वॅलेट / कॅश कार्ड / आयएमपीएस द्वारे ऑनलाईन पध्दतीनेच भरावे लागेल (चलनाव्दारे ऑफलाईन शुल्क भरता येणार नाही).

६) ऑनलाईन आवेदन पत्रासोबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जोडण्याची आवश्यकता नाही.

७) मुळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीस अधीन राहून उमेदवारांना परिक्षेस तात्पुरता प्रवेश दिला जाईल. ऑनलाईन आवेदन पत्रामध्ये भरलेल्या माहितीत व मुळ कागदपत्रांमध्ये तपासणीअंती तफावत आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर निवड एकतर्फी रद्द करण्यात येईल. ऑनलाईन अर्ज भरतेवेळी ज्या बाबींची माहिती होय/नाही स्वरुपात भरण्यात आलेली आहे, त्या अनुषंगाने प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीवेळी विचार केला जाईल. प्रत्यक्ष तपासणीवेळी बदल मान्य केला जाणार नाही. उदा.महिला/खेळाडु/प्रकल्पग्रस्त/आदी आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिता या रकान्यात नाही असे नोंदविलेले असेल व प्रत्यक्ष कागदपत्रे सादर करतांना जरी उमेदवार महिला/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/आदी असेल अथवा इतर संबंधित दस्ताऐवज असतील तर ते विचारात घेतले जाणार नाही.

८) संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षा राज्यातील जिल्हयांच्या मुख्यालयी आयोजीत करण्यात येणार आहे.

९) परिक्षा शुल्क, परिक्षेचा अभ्यासक्रम, परिक्षेकरीता नोंदणी व इतर अधिक माहिती उमेदवारास www.mahapariksha.gov.in व www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळावर पाहता येईल.

**स्थळ - अमरावती**
**दिनांक - ०३/०१/२०१९**

अध्यक्ष,
**विभागीय निवड समिती तथा**
**विभागीय कृषि सहसंचालक**
**अमरावती विभाग, अमरावती**